**बाजीराव लिपने व इतर विरुध्द भानुदास लिपने व इतर**

## नि.क्र. ०७ वर आदेश पारीत.

वादी यांनी मौजे सिध्दनाथ बोरगांव ता. सेलु जि. परभणी येथील शेत गट क्र. २३८ मधील जमिनीची मोजणी तालुका भुमी अभिलेख कार्यालय,सेलु यांची नियुक्त करुन त्यांना मोजणी करुन नकाशा पंचनामा, हद्खुणा करुन अहवाल दाखल करण्याचे निर्देश देण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्याचे समन्सची बजावणी होऊन देखील हजर झाले नाहीत व त्यांना दावा दाखल केल्याची माहिती असुन देखील ते वादीच्या मालकी व ताब्यामध्ये अडीअडथळा व हरीहरकत करीत आहेत व बऱ्याच प्रमाणात वादमिळकतीवर त्यांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे सत्य परिस्थीती न्यायालयासमोर येण्याच्या दृष्टीने उप–अधीक्षक, भुमी अभिलेख, सेलु यांना न्यायालयामार्फत आयुक्त नियुक्त करुन वादीच्या वादमिळकतीची मोजणी करुन हद्द खुणा कायम करणे गरजेचे आहे. वादी हा मोजणीसाठी व न्यायालय आयुक्त यांचा भत्ता यासाठी आवश्यक असणारी निर्धारित फी भरणा करण्यास तयार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची वादीने विनंती केली आहे.

०३. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित झाल्याने सदर अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

०४. प्रस्तुतचा दावा हा वादींनी त्यांच्या नावाने असलेली वादमिळकतीची न्यायालयमार्फत मोजणी करुन सदर क्षेत्र हद्दबंद खुणा कायम करुन मिळण्याकरीता व मोजणी अंती जर प्रतिवादींचे वादींच्या जमिनीवर अतिक्रमण आढळुन आले तर प्रतिवादींनी केलेल्या त्या अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा वादीला देण्याबाबत दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप तसेच वादीने केलेली मागणी व त्याच्या मालकी हक्काच्या शेत जमिनीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे काय तसेच त्यांनी अतिक्रमण केले असल्यास ते किती क्षेत्रफळावर आहे हे तोंडी पुराव्यांव्दारे होऊ शकत नाही. वादीने अभिलेखावर मौजे सिध्दनाथ बोरगांव ता. सेलु जि. परभणी येथील शेत गट क्र. २३८ च्या सात–बाराची प्रत दाखल केली आहे. सदर सात–बाराचे अवलोकन केले असता सदरच्या गटात वादी व प्रतिवादींची जमिन असल्याचे दिसुन येते. त्याकरीताशेत सर्वे गट क्र.२३८ च्या संपुर्ण

जमिनीची तसेच सह सामाईक सहभागदारकांची शेत जमिन मोजणी झाल्या शिवाय वादीच्या जमिनीवर नेमणे कोणाचे अतिक्रमण निघते हे स्पष्ट होणार नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या शेताची सुध्दा मोजणी झाल्या शिवाय वस्तुस्थिती समोर येणार नाही. अशा परिस्थीतीत, संपुर्ण शेत गट क्रमांक २३८ ची मोजणी होणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**०१**. अर्ज नि.क्र.०७ मंजूर करण्यात येतो.

**०२**. मौजे सिध्दनाथ बोरगांव ता. सेलु जि. परभणी येथील शेत गट क्रमांक २३८ मधील जमिनीची सह सामाईक सहभागदारांकांची शेत जमिनीची, मोजणी व हद्द खुणा कायम करण्याकरिता उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

**०३**. उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी संपुर्ण गट क्रमांक २३८ ची मोजणी करुन वादीची उपरोक्त नमूद शेत जमीनीची हद्द खुणा कायम कराव्यात तसेच वादीच्या जमीनीसंदर्भात जायमोक्यावर असलेल्या स्थितीचा पंचनामा, नकाशा तयार करुन तत्संबंधीचा सविस्तर अहवाल प्रस्तुत प्रकरणी लवकरात लवकर दाखल करावा.

**०४**. वादीने आवश्यक न्यायालयीन शुल्क एक महिन्याच्या आत भरणा करावे.

**०५**. वादीने मोजणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व दाव्याची प्रत न्यायालयीन आयुक्त यांना पुरवावी.

**०६**. येणे प्रमाणे न्यायलयीन आयुक्त यांना प्रस्तुत आदेशाचे पत्र जारी करण्यात यावे.

GAURAV ANANTRAO TARAL
Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL
Date: 2026.01.05 17:42:16 +0530

दिनांक – ०५.०१.२०२६

**(जि.ए.तराळ)**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

सेलू जि.परभणी